"नांदेड जिल्हा उद्योग केंद्राचे लघु उद्योगाच्या विकासातील योगदान एक विश्लेषणात्मक अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, विष्णुपुरी ,नांदेड.

सामाजिक शास्त्रे विद्याशाखा अंतर्गत अर्थशास्त्र विषयाच्या पी एच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा

शोध - प्रबंधाचा आराखडा

-: संशोधक :-

विजयकुमार रामचंद्रराव मानेकर

(एम.ए.अर्थशास्त्र बी.एड्.)

Email ID : manekarvijay@gmail.com

Mobile No.: ८३९०६९७७७७

-: संशोधक मार्गदर्शक :-

डॉ.टी.व्ही.पोवळे

सहाय्यक प्राध्यापक व संशोधक मार्गदर्शक ,

अर्थशास्त्र विभाग, कै.बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय, उमरी

ता.उमरी जि.नांदेड

Email ID : tuks.powale@gmail.com

Mobile No.: ९४०३११७०८४

२०१६

"नांदेड जिल्हा उद्योग केंद्राचे लघु उद्योगाच्या विकासातील योगदान एक विश्लेषणात्मक अभ्यास"

प्रस्तावना

भारताच्या सर्वांगीण परिस्थितिचा विचार करता भारतात लघु उद्योगांचे अनेक दृष्टिने महत्व असून अर्थव्यवस्थेत महत्वाचे स्थान आहे. लघु उद्योग म्हणजे असे उद्योग की ज्यात मजूरीच्या मोबदल्यात परिश्रम करणा-या व्यक्तींची संख्या १० ते ५० पर्यंत असते. उत्पादनाचे काम कारखानदाराच्या घरी न होता औद्योगिक क्षेत्रात होतोआणि भांडवली गुंतवणुकही २० लाख रुपया पर्यंत असते. अशा उद्योगांना लघु उद्योग म्हणतात. राष्ट्रीय उत्पादनात भर घालणारे, रोजगार निर्मितीची हमखास व मोठी क्षमता असणारे, थोडे भांडवल व साधे कौशल्य यावर चालणारे, आयातीवर फारसे विसंबून न राहणारे व विकेंद्रिकरण साध्य करणारे असे बहुगुणी स्वरूपाचे लघु उद्योग असतात. तसेच लघु उद्योगांमुळे आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होते. जनतेच्या उत्पन्नात व राहणीमानात वाढ साधता येते, शेती विकासाला चालना मिळते, औद्योगिक शांतता टिकुन राहते, परकीय चलन अधिक प्रमाणावर मिळते, बाजारभावात स्थिरता टिकवून ठेवणे शक्य होते.

भारतासारख्या विकसनशील देशाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टितून लघु उद्योगांना खुपच मोठे महत्व आहे. भारतात नैसर्गिक साधन-संपत्ती भरपूर आहे. तिच्यात विविधता आहे, याचबरोबर भारतात श्रम-शक्तीही विपुल प्रमाणात उपलब्ध आहे. या सर्वांचा उपयोग करून घेऊन देशाच्या आर्थिक विकासाची गती वाढवणे शक्य होऊ शकेल. उद्योगधंद्यांचे विकेंद्रिकरण करणे, विभागीय विकास घडवून आणणे व स्थानिक बाजारपेठांना उपभोग्य वस्तूंचा पुरवठा करणे या गोष्टी लघु उद्योगांच्या सहाय्याने होणे शक्य आहे.

सन १९७७ च्या औद्योगिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर जिल्हा उद्योग केंद्र स्थापन करण्याचा उपक्रम भारत सरकार तर्फे राबविण्याचे निश्चित करण्यात आले. देशाच्या प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा उद्योग केंद्र स्थापन कारण्याचे ठरले. जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयां-ची दि. १ मे १९७८ पासून स्थापना करण्यात आली. लघु उद्योग व कुटीर-उद्योगांचा विकास ग्रामिण भागात करण्याचा मुख्य हेतू होता. शहरातून ग्रामीण भागात उद्योगाचे एका ठिकाणी जाळे तयार करणे व जिल्ह्यातून त्याचे सनियंत्रण होणे हे ही मुख्य उद्देश होते. त्यासाठी भारत सरकारने राज्य सरकारासाठी मार्गदर्शक तत्वे निर्गमित केलेली आहेत. महाराष्ट्रात आतापर्यंत ३४ जिल्हा उद्योग केंद्र स्थापन झालेली आहेत व ती केंद्रे सुरू आहेत.

जिल्हा उद्योग केंद्राचे प्रमुख काम उद्योजकांना शासनाची सर्व मदत व परवाने सुलभरीत्या उपलब्ध करून देणे व ग्रामिण भागात उद्योगांना स्थापन होण्यासाठी प्रोत्साहन देणे इ. आहे.

जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना :-

सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगार मिळण्याचे दृष्टिने जिल्हा उद्योग केंद्रामार्फत सुधारीत बीज भांडवल योजना, जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना, उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम आणि पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम राबविले जातात.

१) सुधारीत बीज भांडवल योजना :-

सुशिक्षित बेरोजगार युवकांना उद्योग व व्यापारसेवा उपक्रमात रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने ही योजना सुरू केली आहे. सदर सुधारित बीजभांडवल योजना संपूर्ण राज्यासाठी लागू असून, जिल्हा उद्योग केंद्र व बँकेमार्फत ती राबवण्यात येते.

२) जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना :-

मुख्यत: ग्रामीण भागात आणि ग्रामीण कारागिरांसाठी 'जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) कर्ज योजना' राबवली जाते. राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात डीआयसीचे ऑफिस आहे. त्यांच्याकडून छोट्या उद्योगासाठी अत्यंत सवलतीच्या दरात कर्ज उपलब्ध होऊ शकते.

३) उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम :-

अनेक तरुणांचा कल नोकरीपेक्षा स्वयंरोजगाराकडे असतो. बऱ्याचदा मनासारखी नोकरी न मिळाल्यामुळे किंवा असलेल्या नोकरीत चरितार्थ समाधानकारकपणे भागत नसल्यानेही अनेक जण स्वयंरोजगाराचा विचार करतात, पण त्यासाठी नेमकं काय करायचं याची माहिती नसल्याने अनेक तरुणांची ही मनीषा मनातच राहते आणि ती सफल होऊ शकत नाही. मात्र त्याची प्राथमिक माहिती जरी मिळाली तरी अनेक तरुण स्वयंप्रेरणेने स्वयंरोजगाराकडे वळू शकतात आणि आपल्या सारख्या इतरही अनेकांना नोकरी देऊ शकतात. सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगारासाठी प्रवृत्त करण्यासाठी शासनातर्फे उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम राबवला जातो.

४) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम :-

संपूर्ण देशातल्या कोणाही नागरिकाला या योजनेंतर्गत लाभ घेता येईल. देशात नवीन सूक्ष्म उद्योग स्थापन करून ग्रामीण व शहरी भागात रोजगार निर्मिती करणे हा योजनेचा उद्देश आहे. राज्यात जिल्हा उद्योग केंद्र, खादी ग्रामोद्योग मंडळ, खादी ग्रामोद्योग आयोग आणि राष्ट्रीयीकृत बँकेतर्फे ही योजना राबवली जाते.

संशोधनाची समस्या :-

भारत हा एक विकसनशील देश आहे. देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये बेरोजगारी, दारिद्य, आर्थिक विषमता यासारख्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्या सोडवायच्या असतील तर देशात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करावी लागते. त्यासाठी भारत सरकारने संपूर्ण देशात १९७७ च्या औद्योगिक धोरणानुसार जिल्हा उद्योग केंद्र स्थापन कारण्याचा निर्णय घेतला. आणि ती प्रत्येक जिल्यात स्थापन देखिल करण्यात आली. परंतु त्यांच्यामार्फत लघु उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी अनुकुल वातावरण निर्माण झाले का? सुशिक्षित बेरोजगार तरुणांना स्वयं रोजगाराकडे आकर्षित करण्यात त्यांना यश आले का? ग्रामीण भागातील तरुणांना लघु उद्योगासाठीचे आवश्यक ते मार्गदर्शन उपलब्ध करुण दिले जाते का ? यासारख्या अनेक प्रकारचे प्रश्न संशोधकाच्या मनात निर्माण झाले. त्यामुळे संशोधकाने " नांदेड जिल्हा उद्योग केंद्राचे लघु उद्योगाच्या विकासातील योगदान एक विश्लेषणात्मक अभ्यास " असा विषय संशोधना -साठी निवडला आहे.

संशोधनाचे महत्व :-

महाराष्ट्र राज्याच्या नांदेड जिल्ह्यातील लघु उद्योगाच्या संदर्भात हा अभ्यास खुप महत्वाचा ठरणार आहे. हा अभ्यास प्रामुख्याने शासनाकडुन प्रोत्साहन दिल्या जाणा-या अल्प भांडवल आणि श्रमप्रधान क्षेत्राच्या म्हणजेच लघु उद्योगाच्या विकासाशी संबंधीत आहे. परंतु या क्षेत्राची प्रगति अपेक्षे प्रमाणे झाली नाही. त्यामध्ये अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे या अभ्यासाचे महत्व वाढविण्यासाठी, लघु उद्योगाच्या सुलभ कार्य पद्धतिला प्रतिबंध करणा-या विविध समस्यांवर प्रकाश टाकणे शक्य होणार आहे. भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेमध्ये लघु उद्योगाची भूमिका आणि स्थान ठरवण्यासाठी अनेक संघटित अभ्यास झालेले आहेत. परंतु हा अभ्यास योजनाकर्त्यांसाठी लघु उद्योगाच्या समस्या सोडविण्यासाठी उप- युक्त ठरणार आहे. त्याचबरोबर भविष्यकाळात उत्पादन, व्यवस्थापन,

विपणन आणि वित्तीय समस्या याबाबत होणा-या संशोधनासाठी हा अभ्यास उपयुक्त ठरणार आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

१) नांदेड जिल्ह्यातील लघु उद्योगांच्या विकासाचा आणि समस्यांचा अभ्यास करणे.

२) नांदेड जिल्ह्यातील लघु उद्योगांच्या संवर्धनामध्ये जिल्हा उद्योग केंद्राच्या भूमिकेचे विश्लेषण करणे.

३) जिल्हा उद्योग केंद्रामार्फत लघु उद्योगांना होणा-या कर्ज पुरवठ्याचा अभ्यास करणे.

४) जिल्हा उद्योग केंद्रामार्फत ग्रामीण व शहरी भागात केल्या जाणा-या कर्ज पुरवठ्याचा तुलनात्मक अभ्यास करणे.

५) जिल्हा उद्योग केंद्रामार्फत केलेल्या कर्ज पुरवठ्याचा प्रत्यक्षात लाभ-र्थ्यांना झालेल्या लाभाचा अभ्यास करणे.

६) लघु उद्योगांच्या कार्यक्षम कार्य पद्धतिसाठी शिफारशी सूचविणे .

संशोधनाची गृहितके :-

१) नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील उद्योजकांच्या समस्या वेगवेगळ्या आहेत.

२) नांदेड जिल्ह्यातील लघु उद्योगांना होणारा कर्ज पुरवठा कमी आहे.

३) जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविण्यात येणा-या योजनांची माहिति प्रत्यक्षात लाभार्थ्यांपर्यंत पोहचत नाही.

४) जिल्हा उद्योग केंद्रामुळे रोजगार निर्मितीत लक्षणीय वाढ झाली नाही.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-

प्रस्तुत अभ्यासात नांदेड जिल्हा उद्योग केंद्रामार्फत लघु उद्योगांच्या विकासासाठी राबविल्या जाणा-या योजनांचा अभ्यास केला जाणार आहे. त्यामध्ये प्रामुख्याने जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना , सुधारीत बीज भांडवल योजना, उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम आणि पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम यांचा अभ्यास केला जाणार आहे. तसेच या योजनांच्या लाभार्थ्यांच्या समस्यांचा देखील अभ्यास केला जाणार आहे.

संशोधन पद्धति :-

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धतिनुसार सर्वेक्षणात्मक तसेच विश्लेषणात्मक संशोधन पद्धतिचा अवलंब करण्यात येईल. तथ्य संकलनासाठी प्राथमिक सामग्री आणि दुय्यम सामग्री या दोन्ही प्रकारांचा अवलंब करण्यात येईल .

तथ्य संकलनाच्या पध्दति :-

तथ्य संकलनाच्या दोन पध्दति आहेत.

१) प्राथमिक पध्दत :-

प्रस्तुत विषयाच्या संशोधन कार्याची अचूक माहिती मिळविण्या-साठी प्राथमिक पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. प्राथमिक पध्दतीमध्ये प्रश्नावली या साधनाचा वापर माहिती संकलनासाठी करण्यात येईल. नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील लाभार्थ्यांकडुन प्रश्नावली भरुन घेतली जाईल.

नमुना निवड -

सामग्रीचे संकलन करण्यासाठी ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भागातील कार्यरत लाभार्थ्यांचे प्रत्येकी १०० नमुने निवडले जातील. लघु उद्योग १००(ग्रामीण ५०+शहरी ५०) आणि प्र.मं.रो.नि.का. १०० (ग्रामीण ५०+शहरी ५०) असे एकुण २०० नमुने नांदेड जिल्हा उद्योग केंद्राकडुन उपलब्ध झालेल्या मागील १० वर्षातील लाभार्थ्यांच्या यादीतून निवडले जातील. त्यासाठी नांदेड जिल्हा उद्योग केंद्राशी संर्पक केला जाईल.

२) दुय्यम पध्दत :-

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी प्राथमिक सामग्री बरोबरच दुय्यम सामग्रीचा वापर करून सामग्रीचे संकलन केले जाईल. यामध्ये प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्रे, दैनिके, मासिके, कार्यालयीन अहवाल तसेच इंटरनेट- वरील संबंधीत माहिती इत्यादी साधनांचा आधार घेण्यात येईल.

संशोधनाचा कालावधी :-

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी सन २००६-०७ ते २०१५-१६ हा १० वर्षाचा कालावधी निवडला आहे. या कालावधीतील लघु उद्योग आणि पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम यांच्या लाभार्थांशी संबंधित माहिती आकडेवारीच्या स्वरूपात संकलित केली जाणार आहे. ही माहिती त्यांची स्थापना, कार्यपध्दति, वृध्दि आणि समस्या यांच्याशी संबंधित असेल.

आकडेवारीचे विश्लेषण :-

प्रस्तुत विषयाच्या संशोधनातील आकडेवारीचे विश्लेषण करण्या- साठी गणितीय आणि सांख्यिकीय साधनांचा वापर करण्यात येईल. जसे शेकडेवारी , वृध्दिदर, सहसंबंध, प्रतिपगमन, t - चाचणी, ANOVA इत्यादी. सामग्रीचे विश्लेषण करण्यासाठी सारणी, तक्ते आणि आलेखांचाही उपयोग करण्यात येईल.

प्रकरणांची मांडणी :-

१) प्रस्तावना.

२) संशोधन साहित्याचा आढावा.

३) नांदेड जिल्ह्याच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितिचा अभ्यास.

४) जिल्हा उद्योग केंद्रामार्फत विविध योजनांवर केला जाणारा कर्जपुरवठा.

५) नांदेड जिल्हा उद्योग केंद्रामार्फत केल्या जाणा-या कर्जपुरवठ्याच्या लाभाचा अभ्यास.

६) निष्कर्ष आणि शिफारशी.

संदर्भ सूची :-

१) डॉ. सुधीर बोधनकर, प्रा. विवेक अलोनी व ॲड.मृणाल कुलकर्णी, सामाजिक संशोधन पध्दती, श्री साईसाथ प्रकाशन, नागपुर.

२) डॉ. बी.एम.क-हाडे, शास्त्रीय संशोधन पध्दती, पिंगळापुरे प्रकाशन, नागपुर.

३) Sivayya and Das (1990), "Cottage and Small Industries", Indian Economy, Sultan Chand Publication, New Delhi.

४) www.di.maharashtra.gov.in

५) www.nandeddic.in

संशोधक मार्गदर्शक **संशोधक**

डॉ. टी.व्ही.पोवळे **व्ही.आर. मानेकर**